



सत्र - 2017 - 18


नूतन
वर्षाभिनन्दन



# मुखपृष्ठाविषयी.....

'अंतर्नाद' मराठी साहित्यजगतात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे एक प्रतिष्ठित मासिक. सांस्कृतिक समृदधी जोपासण्याचे ध्येय मनात ठेवून हे दर्जेदार मासिक मराठी साहित्यप्रेमींच्या मनावर अधिराज्य करत होते. गेल्या २०-२२ वर्षात 'अंतर्नाद' मासिकाने वाचकांपर्यंत उत्कृष्ट साहित्यिक ठेवा पोहचवला. वाचकांच्या अनुभवांना अर्थपूर्णता देत त्यांच्या जाणिवा समृदध केल्या. ह्या मासिकाने साहित्यसृष्टीला दिलेले योगदान खरोखर शब्दातीत आहे. WhatsApp, Facebook च्या या युगात वाचनवारसा जपण्याचा अविरत प्रयत्न करणारे हे अप्रतिम मासिक आता बंद होणार ही साहित्यविश्वाची खूप मोठी हानी म्हणावी लागेल.

आमच्या शाळेच्या वाचनालयात नियमित येणाऱ्या या 'अंतर्नाद'ची आठवण हस्तलिखित करतांना आम्हाला प्रकर्षने झाली आणि 'अंतर्नाद' हे नाव सर्वानुमते ठरवले.

'अंतर्नाद' मासिकाच्या २२ वर्षाच्या साहित्य सफरीला आमची ही मुखपृष्ठरूपी सलामी.

गौरी मिसुरकर

# अंतरंग



| अ.क्र. | लेख / कविता | लेखक / कवी | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| १) | सुंदर हात | मानसी राऊत | १ |
| २) | फुड पॉईंट | समृद्धी खडसे | ६ |
| ३) | दिव्यत्वाची जेथ प्रचिती | अनिकेत पाटखेडकर | ७ |
| ४) | ज्ञानदायिनी (कविता) | गौरी मिसुरकर | १० |
| ५) | मनातलं.... (पत्र) | वैष्णवी सुरडकर | ११ |
| ६) | हसवाहसवी (संकलन) | ओजस्वी बोर्डे | १२ |
| ७) | निरामय हवा केंद्र (जाहिरात) | गौरी मिसुरकर | १३ |
| ८) | प्रवास जिद्दीचा... | मानसी राऊत | १४ |
| ९) | आरोग्य टिप्स | ओजस्वी बोर्डे | १७ |
| १०) | माझे बाबा (कविता) | अनिकेत पाटखेडकर | १८ |
| | चित्रमालिका (संकलन) | कोमल पाटणकर | |
| ११) | श्रेष्ठ कोण ? | गौरी मिसुरकर | १९ |
| १२) | मैत्री प्रसारमाध्यमांशी | वैष्णवी सुरडकर | २३ |
| १३) | मैत्री विज्ञानाशी (संकलन) | राधिका महल्ले | ३० |
| १४) | उलट्या चष्म्यातून (रसग्रहण) | वैष्णवी सुरडकर | ३१ |

| अ.क्र. | लेख / कविता | लेखक / कवी | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| १५) | देवदूताचे मंत्र (कविता) | अनिकेत पाटखेडकर | ३४ |
| १६) | साहित्यमय सफर | मानसी राऊत | ३५ |
| १७) | जागवा वाचनसंस्कृतीला | गौरी मिसुरकर | ३८ |
| १८) | विचारमोती (संकलन) | कोमल पाटणकर | ४० |
| १९) | WhatsApp च्या युगात (कविता) | गौरी मिसुरकर | ४१ |
| २०) | चित्रकोडे | राधिका महल्ले | ४२ |
| २१) | मूल्यशिक्षणाची गरज | अनिकेत पाटखेडकर | ४३ |
| २२) | कलास्वाद (संकलन) | समृद्धी खडसे | ४५ |
| २३) | वेगळी वाट (मुलाखत) | ओजस्वी बोर्डे<br>वैष्णवी सुरडकर | ४६ |

# सुंदर हात

दुपारचे दोन वाजले, म्हणजेच सायली शाळेतून येण्याची वेळ झाली असा विचार करून आजीने हळूच खिडकीतून डोकावलं. रस्त्याच्या टोकाशी सायकलवरून येणारी आपली नात तिला पटकन ओळखू झाली. तिच्या एकूण हालचालीवरूनच "काहीतरी बिनसलयं!" हे आजीने ओळखलच !

नेहमी घराच्या फाटकापासूनच हाक मारणारी सायली, आज शांततेत सायकल ठेवून घरात शिरली, तरी कळायला मार्ग नाही. शिवाय, आज चेहऱ्यावर नेहमीच उत्साह नव्हता शेवटी आजीनेच अंदाज बांधायला सुरूवात केली. अरे हो! आज शाळेतील चित्रकला स्पर्धेचा निकाल होता. त्यामुळे स्वारी रुसलेली दिसतेय !



"आज चित्र बाईंना आवडलं नाही वाटतं!", आजी सायलीकडे पाहून म्हणाली. आता रागाचा फुगा फुटेल' असं वाटलं तिला ! "नाही आजी, स्पर्धेत पहिलाच क्रमांक आला आहे माझा", सायली शांतपणे म्हणाली. मग आता हिला रडायला काय झालं ? असा विचार करत असतानाच, सगळा प्रकार आजीच्या लक्षात आला. 'नक्कीच हिला कुणीतरी चिडवलं असणार'.

दहा वर्षांची सायली अभ्यासापासून ते


खेळापर्यंत प्रत्येक गोष्टीत नेहमी अव्वल असायची. गोरी, चुणचुणीत, दाट-कुरळ्या केसांची ही गोड मुलगी घरी, शाळेत सगळ्यांचीच लाडकी! नाही म्हणायला, तिला चिडविण्यासाठी एकच गोष्ट तिच्या समवयस्क मित्रमैत्रिणींकडे होती. सायली लहान असताना एका दुर्दैवी घटनेत तिच्या डाव्या हाताला गंभीर दुखापत झाली होती. पुढे अनेक शस्त्रक्रियांनंतर तो हात पूर्ववत झाला असला तरीही थोडासा वाकडा राहिला होता. करंगळीच अर्ध बोट त्याच अपघातात गमावलं होतं. अर्थात, त्यामुळे फारसं काही बिघडलं नव्हतं. सायली सगळ्यांप्रमाणेच इतर कामं सहज करू शकत होती. इतकंच काय तर अगदी सहा-सात वर्षांची असेपर्यंत सायलीला त्याबद्दल फारसं काही वाटलंही नाही. हा नवा प्रकार मात्र, अगदी अलीकडेच सुरू झाला होता. तिच्याच वर्गातील काही विशिष्ट मुला-मुलींनी या गोष्टीवरून तिला चिडवायला, नावं ठेवायला सुरुवात केली होती आणि हळूहळू सायलीच्या मनात, आपल्या या 'वेगळ्या' असलेल्या हाताविषयी न्यूनगंड निर्माण झाला.

आता सध्या, कितीही सांगितलं, समजावलं तरी सायली ऐकणार नव्हती हे आजीला माहिती होतं. कारण, लहान मुलांच्या भावविश्वात, मित्रमैत्रिणींच्या बोलण्याला एक वेगळंच महत्त्व असतं.

शाळेतील शिक्षकांनीही या प्रकरणात लक्ष घालून त्या विद्यार्थ्यांना समजावून सांगितले होते.


पण शेवटी लहान मुलच ती ! या-ना-त्या कारणा-वरून, एखादेवेळी गप्पांमध्ये कुणीतरी काही बोलून जायचं आणि मग एरवी सतत हसणारी सायली गप्प आणि उदास होऊन जाई.

आज सुद्धा असच काही झालं असावं, असा अंदाज आजीने बांधला. आता सध्या, कितीही सांगितलं, समजावलं तरी सायली ऐकणार नाही, हे आजीला पूर्वानुभवावरून माहिती होतं. कारण, लहान मुलांच्या भाव-विश्वात, मित्रमैत्रिणींच्या बोलण्याला एक वेगळच महत्त्व असत. शेवटी, तिचं लक्ष या प्रकरणावरून विचलित करण्यासाठी एक फेरी घराबाहेर मारून यावी, असं आजीने ठरवलं.



आजी आणि नात, दोघीही घरापासून थोड्याच अंतरावर असलेल्या मंदिरात जाण्यासाठी निघाल्या. वाटेतही, सायली काहीच बोलली नाही. पण रस्त्यावरुन तुरुतुरु पळणाऱ्या छोट्या कुत्र्याच्या पिल्लाला पाहून हसली मात्र नक्की। 'येईल गाडी हळूहळू रूळावर' आजी मनात म्हणाली. आजी तिच्या मैत्रिणींशी बोलत असताना सायली एकटीच मंदिराभोवतीच्या बागेत खेळत होती. तिथे बाकावर बसलेल्या एका तरुणीने सायलीचे लक्ष वेधले. कदाचित कॉलेजमध्ये असेल ती ताई. तिच्या डोळ्यांवर काळा चष्मा होता. तसेच ती हाताच्या स्पर्शाने, पुस्तक वाचत

होती. ती तरूणी अंध आहे, हे सायलीच्या लक्षात आलं आणि साहजिकच तिला त्या तरूणीबद्दल वाईट वाटलं. तेवढ्यातच, रस्त्याच्या विरूद्ध बाजूस असलेल्या बस स्टॉपवरून हॉर्नचा आवाज ऐकू आला. बस आल्याने तिथे गर्दी वाढली होती. तो आवाज ऐकून ती तरूणीही लगबगीने उठली. हातातलं पुस्तक बॅग-मध्ये ठेवून, काठीचा आधार घेत ती एकटी पटकन बागेच्या बाहेर आली. दृष्टी नसूनही आत्मविश्वासानं पुढे जाणाऱ्या त्या ताईचं, सायलीला कौतुक वाटलं. 'पण आता ती अचानक थांबली का?', असा प्रश्नही पडला. रस्त्यावर गाड्यांची वर्दळ होती. तो ओलांडण्यासाठी अर्थातच मदतीची गरज भासणार होती. तो रस्त्यावरून जाताना कोणाचंही तिच्याकडे लक्ष गेलं नाही. बस पाच-दहा मिनिटांपेक्षा अधिक थांबणार नव्हती, त्यामुळे त्या तरूणीच्या चेहऱ्यावर चिंता दिसू लागली.




नेहमी सगळ्यांच्या मदतीला तत्पर असणारी सायली आजही पुढे झाली. "नमस्कार ताई! मी सायली. तुम्हाला बस पकडायची आहे ना? चला आपण जाऊया!", एवढं

म्हणून, त्या तरूणीचा हात पकडून सायलीने शांततेत रस्ता ओलांडला. गर्दीतून वाट काढून तिला बसमध्ये बसवून दिले.

"धन्यवाद, सायली! आज कॉलेजमध्ये माझा पेपर आहे. तू नसतीस तर आज कदाचित माझं वर्ष वाया गेलं असतं", सायलीचे हात हातात घेऊन ती म्हणाली.

बोलताना, सायलीच्या डाव्या हाताला स्पर्श करताच तेथे त्या तरूणीचा हात थांबला!

आता ही अनोळखी ताईसुद्धा आपल्या या 'अशा' हाताबद्दल प्रश्न विचारून मग नंतर काही बोलेल की काय, असं वाटून सायलीनं नजर दुसरीकडे वळवली.

"सायली, आमचे सर नेहमी म्हणतात, की दुसऱ्यांना मदत करणारे हात नेहमी सुंदर असतात. तुझे हातही असेच सुंदर, म्हणजेच श्रेष्ठ आहेत! तुझं हे सौंदर्य नेहमी असंच ठेव" त्या तरूणीचे हे शब्द ऐकून सायलीला सुखद आश्चर्याचा धक्का बसला. त्या तरूणीला परीक्षेसाठी शुभेच्छा देऊन, 'भेटू पुन्हा' असं म्हणून सायलीने तिचा निरोप घेतला. बस पुढे निघून गेली.

आजीजवळ मंदिरात परत जात असताना, त्या तरूणीचे शब्द आठवून सायली खुदकन हसली! तिच्या मनातील न्यूनगंड आता

कायमचा दुर झाला होता. कोणी कितीही चिडवलं तरी आता तिला कधीच वाईट वाटणार नव्हतं. कारण, त्या अंध तरुणीच्या दिव्यदृष्टीने पाहिलेलं सौंदर्य आणि त्या मागचं रहस्य सायलीने पुरेपुर जाणलं होतं.

खरंच ! नेहमी इतरांची मदत करणारे हात नक्कीच सुंदर असतात !

— मानसी राऊत

कुकपॉईंट

# स्वादिष्ट उपमा



साहित्य : तांदुळाची चुरी २ वाट्या, दाण्याचे [illegible] वाटी, मिरची ४ ते ५, कोथिंबीर, कांदा [illegible] [illegible]दाणे, लिंबू, मिठ, चवीपुरती साखर, जीरे.

कृती : प्रथम तांदुळाची चुरी चिमुटभर मीठ व [illegible] तुप टाकून कुकरमध्ये एक शिट्टी [illegible] कळी शिजवावी व गार करून घ्यावे. [illegible] दाण्याचे कुट, लिंबू रस, मीठ, साखर टा[illegible] घ्यावे. गरम तेलात जीरे, मिरची, कां[illegible] गुलाबी रंग आल्यावर त्यात सर्व जिन्नस टाकून मंद आचेवर वाफ येऊ दयावी. कोथिंबीरने सजवून गरमागरम खाण्यास दयावा.



— समृद्धी ज्ञानेश्वर खडसे [वर्ग-८ वा]
न्यू तापडिया नगर, [illegible].




# दिव्यत्वाची जेथ प्रचिती....

स्वातंत्र्यदेवतेची निष्ठेने आराधना करणारे, क्रांतिकारकांचे मुकुटमणी, महान लेखक, भाषा शुद्धीकार स्वा. विनायक दामोदर सावरकर यांच्या भगूर येथील 'पैतृक' घराचे महाराष्ट्र शासनाने नुकतेच नूतनीकरण केले आहे. स्वातंत्र्यवीरांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या या वास्तूस तेथे प्रत्यक्ष जाऊन नमन करण्याची माझी इच्छा मागील आठवड्यातच पूर्ण झाली. माझ्या आई-बाबांनी मला भगूर येथे स्वातंत्र्यवीरांचे घर दाखवण्यास नेले होते.

स्वातंत्र्यवीरांच्या घरातील प्रवेशद्वारातून आत प्रवेश करतांना एका वेगळ्याच ऊर्जेची जाणीव मला झाली. सावरकरांच्या घराच्या ओसरी वरील भिंतीवर सावरकरांचे तेजपुंज तैलचित्र व त्याच्या बाजूलाच स्वातंत्र्यवीरांचे गीत 'जयोस्तुते श्री महन्मंगले' लावलेले आहे. सावरकरांचे हे तैलचित्र त्यांच्या देदिप्यमान व्यक्तिमत्वाची ओळख आपल्याला करून देते. स्वातंत्र्यवीरांच्या वाड्यातील प्रवेश-द्वाराच्या उजव्या बाजूस असलेल्या अंगणामध्ये

विविध झाडे, फुलझाडे लावलेली आहेत. तसेच तेथे भले मोठे तुळसी वृंदावन आपल्याला दिसते, स्वातंत्र्यवीरांच्या वाड्यातील हा बगीचा पाहून मला 'सागरा प्राण तळमळला' या अजरामर गीतातील या बगीच्याला उद्देशून लिहिलेल्या काव्यपंक्ती आठवल्या. वाड्यातील या अंगणातून आपल्याला स्वातंत्र्यवीरांच्या दोन मजली घराचे नयनरम्य दर्शन होते. पहिल्या माळ्यावरील खिडक्या आपल्याला जुन्या काळात घेऊन जातात. ती वास्तू पाहतांना बालपणीचे सावरकर माझ्या डोळ्यासमोर आले.

या वाड्यातील प्रशस्त खोलीत सावरकरांशी संबंधित अनेक जुनी दुर्मिळ छायाचित्रे तसेच वर्तमान पत्रातील कात्रणे व्यवस्थित फ्रेम करून भिंतीवर लावलेली दिसतात. त्यातील एक कात्रण मात्र आपले लक्ष वेधून घेते ते म्हणजे भगूर वासीयांनी सावरकरांना दिलेले मानपत्र. ते मानपत्र वाचून आपण सावरकरांचे वारस आहोत या भावनेने आपले मन भरून येते.




त्या पवित्र जागेवर आज सावरकरांच्या तरुण वयातील छायाचित्र लावले असून 'स्वा.वीर सावरकरांचे जन्मस्थान असे लिहिलेले आहे. त्या स्थानासमोर आपण नतमस्तक होतो.

पुढे पहिल्या माळ्यावरील मोठी खोली आपल्याला दिसते.

ज्या ठिकाणी सर्वप्रथम ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून देशाला स्वतंत्र करण्याचा विचार त्यांच्या मनात आला व देशहिताबद्दल त्यांच्या वयातील मित्रांसोबत त्यांनी चर्चा केली. याच खोलीत अभिनव भारत या संघटनेचे प्रारंभी चे कार्य केले व बैठका घेतल्या, ती खोली पाहून आपल्या सर्वांगावर शहारे येतात. इतक्या लहानपणी स्वातंत्र्यवीर देशासाठी सर्वस्वाचे बलिदान देण्यास कसे तयार होते हा विचार मनात येतो.

स्वातंत्र्यवीरांच्या वाड्यात फिरतांना मी एका वेगळ्याच विश्वात पोहोचलो. ज्या महान व्यक्तिमत्वा-च्या विचारांनी मी प्रभावित आहे आणि जे माझे आदर्श आहेत त्यांच्या जन्मगावी जाऊन त्यांच्या वास्तव्याने गौरवान्वित झालेल्या वास्तूला भेट देण्याची संधी मला माझ्या आई-बाबांनी



दिली त्याबद्दल मी खरोखरच स्वतःला भाग्यवान समजतो. परततांना स्वातंत्र्यवीरांच्या अतुलनीय कार्यापुढे व उत्तुंग व्यक्तिमत्वापुढे मला सारे जग खुजे वाटत होते. मन सतत त्या पवित्र वास्तुकडे धाव घेत होते. आजही ती आठवण माझ्या मनात खोलवर रूजली आहे.

—अनिकेत पाटखेडकर

# ज्ञानदायिनी

माझी शाळा आहे ज्ञानाचे भांडार,
येथे केले जातात विद्यार्थ्यांवर अप्रतिम संस्कार।


व्यक्तीमत्व घडविणे, बुद्धीमत्ता वाढविणे हे
आहे माझ्या शाळेचे ध्येय ।।
येथील विद्यार्थ्यांच्या यशाचे जाते सर्व
शिक्षकांना श्रेय ।।

माझ्या शाळेचा प्रत्येक विद्यार्थी असतो
चमकणारा तारा ।।
त्याला जन्म देतो माझ्या शाळेचा
आसमंत सारा ।।

विविध स्पर्धांमुळे मिळतो आमच्यातील
सुप्त कलागुणांना वाव ।।
तसेच शाळेच्या पर्यावरणवादी दृष्टिकोनामुळे
शाळा म्हणते वर्षात पाच तरी झाडे लाव।।

बौध्दिक विकास साधतांना शाळा,
शारिरीक विकासासाठीही प्रयत्न करते।।
विद्यार्थ्याला जगाच्या कानाकोपऱ्यात
जगता यावे यासाठी शाळा नेहमी झटते।

- गौरी मिसुरकर.
वर्ग-९ वा.



# मनातलं ....



वैष्णवी अ. सुरडकर
भगतसिंग चौक,
अकोला - ४४४००५
२२ डिसे. २०१८

प्रति,
मा. सौ. रेणू दांडेकर
चिखलगाव,
रत्नागिरी.

मा. महोदया,
शि. सा. न

छात्र प्रबोधन २०१८ च्या दिवाळी अंकातील 'स्वप्नपूर्तीची कृतार्थ वाटचाल' हा आपला प्रेरक लेख मी वाचला. जीवनातील एखादा प्रसंग संपूर्ण आयुष्याला कलाटणी देऊ शकतो हे आपला लेख वाचल्यावर कळले. त्यामुळे भारावलेले माझे मन व्यक्त करण्याचा हा छोटासा प्रयत्न !

शिक्षणाच्या क्षेत्रात सामाजिक कार्य करून ज्ञानगंगा वाहती ठेवण्याचे काम आपण करत आहात त्या कामाबद्दल अनेक पुरस्कारही आपणास प्राप्त झाले आहेत. पण नेमकी ही वाट आपल्याला कशी मिळाली ? त्या क्षेत्रात आपण कसा प्रवेश केला ? याची ओळख या लेखातून झाली. अनेकांना वेगळ्या वाटेने जायचे असते पण त्यांना दिशा मिळत नाही. हा लेख

खरोखरच त्यांच्यासाठी मार्गदर्शन ठरू शकतो.

स्वप्न या संकल्पनेविषयीचा आपला विचार मला आवडला. "कोणत्या स्वप्नांच्या मागे धावायचं? आपल्या की इतरांच्या मनात आपल्याबद्दलच्या असणाऱ्या? हे प्रश्न सगळ्यांनी विचार करण्याजोगे आहेत. कारण जे क्षेत्र आपल्याला खुणावतं तेच क्षेत्र जीवनात समाधान देऊ शकते.


स्वत:तल्या उणिवा जाणून घेऊन आणि स्वत:-ला समजून घेऊन आपण आपल्यात बदल करू शकतो. प्रत्येक दिवस नवीन बदलासह येतोच पण गरज हवी आहे तो बदल समजून घेण्याच्या दृष्टिकोनाची. ही मोठी शिकवण या लेखातून मिळते. हा अद्वितीय लेख अनेक तरुणांना मार्गदर्शनाचा स्त्रोत ठरला. आपल्या पावलावर पाऊल ठेवून आमची पिढी समाजकार्य करण्यात नक्कीच प्रयत्न करेल

आपलीच
वैष्णवी

## हसवा हसवी

डॉ. श्रीराम लागूंना एक तरूण सुंदरी म्हणाली, "तुम्हाला मी कुठेतरी पाहिल्यासारखं वाटतयं." डॉ. लागू म्हणाले, "तुम्ही नटसम्राट नाटक पाहिले आहे का?"
'हो!' 'मग त्यावेळी तुम्ही मला पाहिलं असणार.' लागू म्हणाले
"असेल बाई!" ती म्हणाली, "ते नाटक पाहताना तुम्ही कुठे बसला होता?" डॉ. लागू कोसळले ते बराच वेळ उठले नाहीत

— ओजस्वी अविनाश बोर्डे



# निरामय हवा केंद्र

## आरोग्याचा मंत्र नवा,
## घ्या शुध्द हवा, शुध्द हवा !

शुध्द हवा मिळण्याचे आहे ठिकाण एकमेव ।
विविध रोगांपासून मुक्त होण्याला दिला आहे
केंद्राने वाव ।।

आपल्या आरोग्याशी होणार नाही खेळ ।
खुले आसमंत आणि प्रसन्न वातावरणाचा
घातला आहे सुंदर मेळ ।।

निसर्गाची शुध्द हवा, मिळेल आमच्या घरा ।
पाहिजे असल्यास त्वरा करा ! त्वरा करा
त्वरा करा ।

वेळ : सकाळी ५ ते ७.
भ्रमणध्वनी क्र. : ९२३७८८३११६, ८९०१२४६५०९.
पत्ता : निरामय हवा केंद्र, जीवनदायिनी वाटिका,
अकोला.

संधीचा फायदा घ्या !

– गौरी सुधीर मिसुरकर.

# प्रवास जिद्दीचा ....

क्रिकेट स्टेडियम खचाखच भरलेलं होतं क्रिकेटचं माहेरघर असलेल्या लॉर्डस् मैदानावर चाललेला तो सामना भारतातल्या प्रत्येक घरातील दूरदर्शनच्या पडद्यावर चालू होता आणि प्रत्येक चाहता अत्यंत रोमांचित होऊन ते क्षण जगत होता.

मुळातच 'क्रिकेटवेडा देश' म्हणून प्रसिद्ध असलेल्या भारतात हे दृश्य काही नवीन नाही. पण तरीही तो दिवस, प्रत्येक क्षण अतिशय 'खास' होता. कारण समोर, नेहमीप्रमाणे पुरुष-क्रिकेट संघ नसून महिलांच्या क्रिकेट विश्वचषकाचा अंतिम सामना सुरु होता. भारत विरुद्ध इंग्लंड. शेवटपर्यंत खिळवून ठेवणाऱ्या त्या सामन्यात भारतीय संघाला अवघ्या नऊ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. पण तरीही त्यांनी एक खूप मोठा विजय प्राप्त केला होता. तो विजय होता जिद्दीच्या, संघर्षाच्या प्रवासाचा. तो विजय होता बदलत्या भारतीय क्रिकेट जगताचा.

कपिल देव, गावस्कर, सचिन ते एम.एस. धोनी, विराट कोहली पर्यंत सगळी नावं भारतीयांना नेहमीच तोंडपाठ होती. पण; मिताली राज, एकता बिश्त, राजेश्वरी गायकवाड, झुलन गोस्वामी, मानसी जोशी, मोना मेश्राम, हरमनप्रीत कौर, वेदा कृष्णमूर्ती, शिखा पांडे, स्मृती मानधना, पूनम यादव, नुझत परवीन,

पूनम राऊत ; दीप्ती शर्मा ; सुषमा वर्मा ही नावं मात्र कुणाच्या ध्यानीमनीही नव्हती. हा तोच चमू आहे ज्याने २०१७ विश्वचषक स्पर्धेत गौरवास्पद कामगिरी करून

केवळ भारतातच नाही तर जवळपास सगळीकडे महिलेच्या क्रिकेटकडे फारसं लक्ष दिल जात नाही. पण आपल्याकडे ही तफावत फार मोठ्या प्रमाणात दिसून येते "क्रिकेट खेळणे" ही बाब पुरूषांपर्यंतच मर्यादित आहे ; तो "male-Dominant" खेळ आहे अशी भावना सर्वसामान्यांत दिसून येते. यावर्षीच्या विश्वचषकाने मात्र ही परिभाषाच बदलली. इतकी, की पुरुष संघाची भारत विरूध्द श्रीलंका झुंज पाहण्यापेक्षा लोकांनी महिला संघाच्या सामन्यांना अधिक पसंती दिली. या विश्वचषकात सुरुवातीपासूनच आक्रमक झुंज देणाऱ्या भारताच्या या रणरागिणींवर जगभरातून कौतुकाचा वर्षाव झाला. रॉबिन-राऊंडमध्ये १९ पैकी १६ सामने त्यांनी जिंकले. विशेषत: सेमीफायनल मध्ये सहा वेळा विश्वविजेता ठरलेल्या ऑस्ट्रेलियाला अत्यंत मोठ्या फरकाने हरविले. त्या सामन्यात 'हरमनप्रीत कौरने केलेली '१७१* नाबाद' ही खेळी कितीतरी दिवस सोशल मिडियावर '# Trending' होती. प्रत्येक सामन्यात त्यांची खेळावरील निष्ठा, देशप्रेम, सांघिक ऐक्य, खिलाडूवृत्ती यांचा प्रत्यय आला. आणि भारतातील प्रत्येक क्रिकेट समर्थक या दुसऱ्या भारतीय संघाचाही मोठा चाहता झाला.


भारतीय कर्णधार मिताली राजने महिलांमध्ये सर्वोच्च धावा करण्याचा विक्रम करून जागतिक क्रमवारीत दुसरा क्रमांक प्राप्त केला. अनुभवी गोलंदाज झुलन गोस्वामीने जागतिक जाहीर क्रमवारीत दुसऱ्या स्थानी झेप घेतली. युवा खेळाडूंनी जगभर स्वतःची ओळख निर्माण केली. एवढच नव्हे, तर सहारा स्पोर्टस् अवॉर्डस् मध्ये 'Indian Special Acheivment 2017' या पुरस्काराने महिला क्रिकेट संघाला गौरविण्यात आले. महिला कोणत्याही बाबतीत जराही कमी नाहीत ही जाणीव सर्व भारतीयांना नव्याने झाली.

हा विश्वचषक सर्वार्थाने 'खास' ठरला. मुळात, पुरुषांच्या दोन वर्षांपूर्वीच १९७३ मध्ये सुरु झालेल्या महिला विश्वचषकास प्रथमच भारतात एवढी प्रसिद्धी मिळाली. प्रथमच अत्याधुनिक DRS तंत्रज्ञान महिलांसाठी वापरण्यात आले.

कर्णधार मिताली राजला, "तुमचा आवडता पुरुष क्रिकेटपटू कोण?" असा प्रश्न विचारल्यावर उलटउत्तर देताना, "तुमची आवडती महिला क्रिकेटपटू कोण, असा प्रश्न तुम्ही पुरुष संघाला विचारला का?", हे कणखर उत्तर देऊन तिने सर्वांना अचंबित केले. क्रीडेतही भारतीय महिलांनी अप्रतिम कामगिरी करून भारतातील सर्व मुली, स्त्रियांना नवा आदर्श दिला. २०१७ मध्ये त्याच खऱ्या नायिका ठरल्या, असं माझं मत आहे. कारण त्यांच्या विजयाने भारतातील अगदी सर्वसामान्य मुलीदेखील तो खेळ प्रत्यक्ष खेळण्याबद्दल अधिक उत्सुक झाल्या आहेत.

क्रिकेट स्टेडियमच्या बाहेरील दुकानांत एक दहा वर्षांची चिमुरडी महिला क्रिकेटपटूच्या 'कस्टमाईजड् टी-शर्टस्' ची मागणी करते आणि शाळांमधून झालेल्या सर्वेक्षणात बहुतांश विद्यार्थी महिला विश्वचषकाला 'सर्वात अविस्मरणीय' म्हणतात, तेव्हा भारतीय महिला क्रिकेट संघाने मैदानातीलच नाही तर मैदानाबाहेरची लढाईपण जिंकली आहे; याची प्रचिती येते!


**– मानसी अरुण राऊत**




★ लिंबात सायट्रिक ॲसिड भरपूर आहे. त्यामुळे दातांचे एनॅमल खराब होऊ शकते. म्हणून लिंबू थेट न चोखता नेहमी अन्नातून किंवा पाण्यातून घ्यावा.

## आरोग्य टिप्स

★ लसणामध्ये रक्त पातळ करण्याचा नैसर्गिक गुण आहे. उच्च रक्तदाब, कॉलेस्टेरॉल, DVT अशा आजारांना त्याचा फायदा मिळतो. दररोज लसणाच्या चार पाकळ्या घ्यायला हव्यात.



★ अतिरिक्त मीठ खायचे असल्यास भरपूर व्यायाम, शारिरीक श्रम करून आपण खाल्लेल्या मिठाला जागले पाहिजे.




ओजस्वी अविनाश बोर्डे (वर्ग ८वा)
गोकुळ कॉलनी, अकोला.

# माझे बाबा

बाबा विना माझे तर पानच नाही हलत ।
तुमच्यामुळे सुटतात माझ्या अडचणी चालत बोलत ॥

बाबा तुम्ही माझ्यासाठी खाऊ आणता मस्त ।
क्षणार्धात करतो मी मिटक्या मारत फस्त ॥

दरवर्षी नेता तुम्ही वेगवेगळ्या ठिकाणी ।
हीच तर माझ्यासाठी असते घोल पर्वणी ॥


कायद्याच्या अभ्यासात तुम्ही असता व्यस्त ।
तरीही करडी नजर तुमची घरात बसते शिस्त ॥

किती काळजी घेता तुम्ही घराची व घरच्यांची ।
वेळ मिळाला तरी काळजी घेता का हो स्वतःची ?

चुटकीसरशी सोडवता तुम्ही आमच्या अडचणी ।
म्हणूनच तुमच्याप्रति आदर असे मनोमनी ॥

वडील, पिता, जन्मदाता तुम्हीच आमचे आधार ।
कधीच नाही फेडू शकणार मी तुमचे उपकार ॥

– आनिकेत पाटखेडकर





# श्रेष्ठ कोण ?

([illegible]यातील दिवस होता. विदयार्थ्यांना शाळेला सुट्टी तर असणारच. शाळेतला गोंगाट आता घराघरात आणि रस्त्यावर ऐकू येत होता. शाळा शांत झाली होती. गेम पिरेड्चा गोंधळ, मधल्या सुटीची घडपड आता जरा सुस्तावली होती. वर्गावर्गात अतिशय शांतता पसरलेली होती. त्या – वेळेचा काही मित्रांमधला हा संवाद.)



फळा: शाळेला सुटी लागल्यापासून सगळे वातावरण शांततामय झाले आहे. वर्गात आता असे कंटाळवाणे वातावरण नको वाटते रे! झाडापासून पाने दुरावल्यावर, पानांची जी अवस्था होते तसेच मला वाटते आहे.

खडू: हो रे! खरेच आहे. मी तर कधीचीच शाळा सुरु होण्याची वाट पाहत आहे.

फळा: या वेळेस तर सगळी मुले खेळतांनाही माझीच आठवण काढत असतील. शेवटी शिकतांना मीच येतो ना त्यांच्या कामी!


खडू: असे काही नाही रे! मला तुझ्यावर लिहिले जाते. त्यामुळेच सगळ्यांना ज्ञान मिळते. खरे तर ही मुले नेहमी मलाच स्मरत राहतील.

टेबल: ए! खडूसल्या, जास्त स्वतःला हुशार समजू नकोस. सर्वात श्रेष्ठ तर मीच आहे.

खुर्ची: अरे रे! काय भांडण करताय? सर्वांना ठाऊक

आहे, सर्वात उपयोगी आणि श्रेष्ठ तर मीच ना!
कारण, सर्व विदयार्थ्यांना शिकवणाऱ्या बाई (शिक्षिका)
थकल्यास माझ्याच आधार घेतात ना!

वाक: सगळ्यांनी शांत व्हा! घाई-गडबड करू नका.
अरे मीच श्रेष्ठ आहे. कारण, सर्वांत महत्त्वाचा आहे
विदयार्थी आणि तो माझ्यावर बसूनच विदया
ग्रहण करतो ना! त्यामुळे सर्वोच्च स्थान मलाच.



(वर्गातील गोंधळ ऐकून मुख्याध्यापिकेची
खुर्चीही तिथे आली.)

मुख्य-खुर्ची: एवढा गोंधळ कशासाठी रे! का बरं भांडताय
तुम्ही सगळे?

फळा: आम्ही चर्चा करत होतो की, श्रेष्ठ कोण? मी
सगळ्यांना म्हटले ना की, अरे भांडू नका, मीच
श्रेष्ठ तरी कोणी ऐकेना!

मुख्य-खुर्ची: तू गप्प बस रे जरा! चांगले सविस्तर सांगा,
काय झाले ते...

खडू: अहो मॅडम! हा फळाच तो हा विषय काढणारा.
सगळे शांत होते. मात्र, याने विषय काढला की
श्रेष्ठ मीच आणि त्यावर झाली वादावादी सुरू.

मुख्य-खुर्ची: अच्छा, असे काय! बरं बरे. मी सांगते बघू
की, कोण श्रेष्ठ.

खुर्ची: ठिक आहे. चला मग....

फळा: होऊनच जाऊ दया आता, की कोण श्रेष्ठ!


मुख्य-खुर्ची: शांत. शांत. चला तर मग एकेकाने येऊन आपले
श्रेष्ठत्व सिद्ध करायचे. पहिले तू ये रे खडू!

खडू: हो. मला म्हणायचे होते की, जेव्हा मला रेखाटल्या
जाते तेव्हाच विदयार्थी शिकतो. मी झिजतो तेव्हाच

त्याला ज्ञानप्राप्ती होते.

फळा: खडू झिजतो ते ठिक आहे पण त्याला रेखाटले तर माझ्यावरच जाते ना! माझ्यामुळेच विदयार्थी खरे शिक्षण अवगत करतो.

बाक: विदयार्थी शिकतो, हे ठिक. मात्र, त्याला बसायला तर जागा लागते ना! जी जागा त्याला मी देतो. त्यामुळे मला वाटते, की मीच श्रेष्ठ.



टेबल: माझ्यावर ज्ञानाचा खजिना उभा असतो म्हणजे, माझ्यावर पुस्तके, खडू, छड्या आणि डस्टर मस्त थाटात बसतात. विदयार्थ्यांना आवश्यक असणारी ही साधने माझ्यावर पेटीत बसतात त्यामुळे मी श्रेष्ठ आहे.

डस्टर: अरे, तुमच्या भांडणात, मी तर राहिलोच की? खरंतर मीच श्रेष्ठ, कारण खडू रेखाटलं त्यावर फळ्यावरचे एकच एक ज्ञान घेणार का विदयार्थी? नवीन ज्ञान घेण्यासाठी ते पुसण्याची गरज असणारच. तेव्हा ती गरज मी पुरवतो.

खुर्ची: माझे म्हणणे असे, की सर्वात गुणवान विदयार्थ्यांना शिकवणाऱ्या बाईंचे मी आसन. म्हणून मीच श्रेष्ठ

मुख्य खुर्ची: तुम्हा सर्वांनी आपली मते माझ्या समोर सुंदररित्या मांडलीत. तुमच्यापैकी श्रेष्ठ कोण हे सांगणे खरंतर कठीणच. पण, मला या सगळ्यांमध्ये एक गोष्ट प्रत्येकाच्या मतात आढळली.

सगळे (एका स्वरात): काय?

मुख्य खुर्ची: अरे विदयार्थी. तोच नसेल तर तुमच्या असण्याला काही अर्थच नाही ना! आता विद्यार्थी नाहीत तर तुम्हांला कसे एकटेएकटे आणि कंटाळवाणे वाटते आहे.

मग, तुमच्यापेक्षा विदया घेणारा, ज्ञानार्जन करणाराच श्रेष्ठ ना !

सगळे (एका स्वरात) : होय, खरे आहे. SORRY ! आम्हांला आमची चूक कळली.

मुख्य खुर्ची - ठिक आहे. मात्र, यापुढे अशा गोष्टींसाठी केव्हाही भांडू नका, आणि विदयार्थ्यांबरोबरच तुम्हालाही या शाळेत सर्वोच्च स्थान आहेच. तसेच शिक्षकांनाही मानाचा दर्जा आहे. मात्र, सगळ्यांना हे कळायला हवं. सगळ्यांना हे कळायलं हवं. सगळ्यांनी मिळून कामे केली तरच त्याचा फायदा आहे. मात्र, तुम्ही सगळे असेच भांडलात तर विदयार्थी कसा घडेल ? त्याला आपण असेच संस्कार देणार का ?

सगळे (एका स्वरात) : नाही .....

मुख्य खुर्ची : मग, आपण न भांडता, एकजुटीने काम करायला हवे. तसेच विदयार्थ्यांवर उत्तम संस्कार करायला हवे. म्हणजे, पुढे जाऊन ते देशाचे उत्तम नागरिक आणि चांगले मनुष्य होतील.

सगळे (एका स्वरात) : हो खरे आहे. आज पासून आपण सगळे एकमेकांना सहकार्य करू व विदयार्थ्यांमध्ये उत्तम गुणांचे व संस्कारांचे बीजारोपण करू.

(अशा या भांडणरूपी संवादाचा, प्रेमाने आणि आनंदाने समारोप झाला.)

– गौरी सुधीर मिसुरकर वर्ग ९ वा
शिवाजी नगर, डाबकी रोड,
अकोला.

# मैत्री प्रसारमाध्यमांशी





समाजमाध्यमांमुळे मदतीची गरज असणारा व मदत करणाऱ्यांना जोडणे शक्य होते. काही वेळा मदत करणारे व मदतीची आवश्यकता असणारे जोडल्या न गेल्याने योग्य ती मदत वेळेवर मिळणे शक्य होत नाही.

श्याम हा एक गरीब विद्यार्थी होता. त्याचे वडिल अपघातामुळे जखमी झाले. त्यांना तातडीने रक्ताची आवश्यकता होती. परंतु रक्त विकत घेण्याएवढी त्यांची ऐपत नव्हती. अशावेळी श्यामच्या मित्राने फेसबुक, इन्स्टाग्राम यांसारख्या माध्यमांवर विविध ग्रुपस्‌वर मदतीची मागणी केली. त्याला अपेक्षित प्रतिसाद मिळाला आणि रक्त मिळाले.

अशाप्रकारे समाजमाध्यमांच्या प्रभावी वापरातुन एखादयाचे आयुष्य वाचवले जाऊ शकते. परंतु समाजमाध्यमांचा वापर तारतम्याने करणे आवश्यक ठरते. समाज-माध्यमांचा वापर अगदी कोणीही करू शकत असल्याने त्यावर योग्य व्यक्तींची पारख करणे कठीण ठरते. अनेक तरूणांना इसिसच्या दहशतवादी संघटनांनी सोशल मिडियाद्वारे भुलवल्याचे उदाहरण दिसून येते. त्यामुळे

विवेकबुद्धी वापरून समाजमाध्यमांचा वापर करणे आवश्यक ठरते.


इंटरनेट व वेब यांच्या उपयोगातून सोशल साइटस् तयार झाल्या आहेत. फेसबुक, ट्विटर यांसारख्या सोशल साइट्स म्हणजे एका अर्थी ई-गप्पांचे अड्डे किंवा ई-चव्हाटे म्हणता येतील. या साइट्वर स्वतःचे अकाउंट्स तयार करून त्या-द्वारे आपल्या भावनांना वाट करून देता येते. आपल्याला असलेली माहिती, आपल्या-जवळची छाया-चित्रे अन्य मित्रांना उपलब्ध करून देता येतात. अण्णा हजारे यांचे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन यशस्वी करण्यात या नेटकरांचा मोठा वाटा होता. ही या माध्यमांची ताकद आहे. आपल्या ओळखीच्या लोकांपर्यंतच नाही तर अनोळखींपर्यंत पोहोचण्याचा हा एक उत्तम पर्याय आहे.




अलीकडे बहुतांश घरात स्मार्टफोन दिसतो. खरतर सगळे सोशल मिडियाचा वापर सुद्धा करतात, पण मात्र मर्यादित. एका

विशिष्ट चौकटीच्याबाहेर विचार करता याची अगाध उपयुक्तता दिसेल. आजच्या व्यस्त जीवनात बरीचशी कामं ही समाजमाध्यमा-द्वारे केली जातात. या सोशल मिडियाच्या माध्यमातून लहानातल्या लहान व्यावसायिका-पासून ते अगदी मोठ्या उद्योजकांपर्यंत कुणीही उत्तम प्रकारे व्यवसाय करू शकतो. जाहिरात करण्यापासून ते आपल्या उत्पादना-ची खरेदी - विक्रीसुद्धा सहजपणे एकाच जागी बसून करणं आता शक्य झाले आहे.

आपली मते व्यक्त करण्यासाठी किंवा विविध संदेश पाठविण्यासाठी केला जाणारा समाजमाध्यमांचा वापर हा अनेक जणांना कंटाळवाणा वाटतो. मात्र, याच समाजमाध्य-मांचा वापर करून सध्या विविध वर्ग चालविले जातात. मुंबईत अनेक महाविद्यालये व खुल्या प्रशिक्षण वर्गाचा यात समावेश आहे. व्हॉट्स-ॲप च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समूह बनवून अभ्यासाच्या बाबतींतील विचारांची देवाणघेवाण करता येते. राजकारणात सुद्धा विरूद्ध पक्ष नेते एकमेकांवर टिका करण्यासाठी समाजमाध्यमांचा वापर करतात. सरकार आपल्या योजना सामान्य व्यक्तींपर्यंत पोहोचण्यासाठी, लोकसहभाग वाढवण्यासाठी त्याचा वापर करते. राजकीय पक्ष व त्याचे नेते समाजमाध्यमांवर आपले विचार मांडतात. सामान्य जनता त्यांच्या विचारांवर व्यक्त



होऊ शकते किंवा स्वत:चे विचारही मांडू शकते. यातून लोकशाहीला अधिकाधिक बळकटी मिळते कारण राजकारणातील लोकसहभाग त्यामुळे वाढतो.

विविध शासकीय योजना समाजातील विविध घटकांच्या विकासासाठी सरकारकडून चालू केल्या जातात. हजारो कोटींचा खर्च त्यावर होतो; परंतु अपेक्षित परिणाम कमी असतो. समाजमाध्यमांद्वारे त्यात लोकसहभाग वाढवून घेता येतो. तसेच लोकांच्या योजनेविषयीच्या प्रतिक्रिया, सल्ले, आवश्यक सुधारणा सरकारपर्यंत पोहोचतात. त्यामुळे प्रक्रियेत बदल करणे शक्य होते व पारदर्शकता वाढते.

पानी फाऊंडेशनने FB वर आणि इतर माध्यमांद्वारे लोकांना पाण्याचे महत्व पटवून देण्यास व आपापल्या गावात स्वयं-स्फूर्तीने श्रमदान करण्यास प्रेरित केले.

समाजमाध्यमांचा खरा उद्देश काय असावा तर सकारात्मकता वाढवण्यासाठी, चांगल्या उद्देशांसाठी, विचारांच्या देवाण-घेवाणीसाठी किंवा चांगल्या विचारांच्या परिसंचरणासाठी. खरंतर एका मर्यादेपलीकडे समाजमाध्यमांची उपयुक्तता आपण जाणलेलीच नाही. केवळ चॅटींग किंवा आपल्या फोटोजला अधिकाधिक लाईकस मिळवणे, आपण किती साहसी आहोत हे

आपल्या कृतींतून लोकांपर्यंत पोहोचवणे हा सामान्य वापर सगळेच करतात. पण सोशल मिडियाचा प्रभावी वापर नक्कीच होऊ शकतो.

समाजात बदल घडवून आणताना ती उपयुक्त ठरतात. उदा., नदी, अभियान, स्वच्छ भारत अभियान अशा उपक्रमांचा प्रचार समाजमाध्यमांद्वारे होत असतो. लोकांना संघटित करण्याचे हे एक साधन आहे. प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तीची कार्यक्षमता या माध्यमांद्वारे वाढते. म्हणजे शिक्षकांनी मिळून जर एक ग्रुप तयार केला आणि त्यावर माहितीची देवाणघेवाण केली तर त्यांचे विचारही अपडेट राहू शकतात. तसेच विद्यार्थ्यांना सुदधा ते माहिती देऊ शकतात.

हळूहळू समाजमाध्यमांचे स्वरूप बदलले. व्हॉट्सॲप, फेसबुक, ट्वीटर यांनी त्याची जागा घेतली. पण या माध्यमांची उपयुक्तताही कमी नाही. विद्यार्थ्यांना तज्ञांचे मार्गदर्शन व त्यांची मतं जाणून घेण्यात माध्यमांचा मोठा वाटा असतो.


स्वातंत्र्यापूर्वी जेव्हा आपल्या देशावर ब्रिटिश राजवट अस्तित्वात होती, तेव्हा लोकांच्या मनात त्यांच्या विरोधात भावना जागृत करण्यासाठी समाजमाध्यमांचा वापर केला गेला होता. फक्त तेव्हा त्यांचे स्वरूप वेगळे होते. ब्रिटिशविरोधी आंदोलने करताना लोकसहभाग वाढवण्यासाठी या माध्यमांनी महत्वाची भूमिका बजावली. तेव्हा वृत्तपत्रे समाजमाध्यमांचं काम करायची. केसरी,

मराठा यांसारख्या वृत्तपत्रांतून थोर नेत्यांचे विचार लोकांपर्यंत पोहोचायचे त्यामुळे लोकांमध्ये जागृती घडून यायची.

हळूहळू समाजमाध्यमांचे स्वरूप बदलले. व्हॉट्सअॅप, फेसबुक, ट्वीटर यांनी त्याची जागा घेतली. पण या माध्यमांची उपयुक्तताही कमी नाही. विद्यार्थ्यांना तज्ञांचे मार्गदर्शन व त्यांची मतं जाणून घेण्यात माध्यमांचा मोठा वाटा असतो. यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या करियरच्या दृष्टीने वाटचाल करण्यास मदत होते. पूर्वी लोकांना डॉक्टर, इंजिनीयर, शिक्षक अशी मर्यादित करिअर क्षेत्रे माहिती होती. पण समाजमाध्यमांच्या सहाय्याने दुर्मिळ अशी क्षेत्रे लोकांना माहित होत आहेत. त्यांच्या शिक्षणा-विषयी सुद्धा सहज माहिती मिळवणे शक्य होते.

घरगुती व्यवसायांना देखील चालना मिळते. युट्युब वर अनेक गृहीणी, तरुण आपले व्हिडियो अपलोड करतात, स्वत:चे चॅनल निर्माण करतात त्यामुळे जी कौशल्ये आधी दबून रहायची त्यांना आता वाव मिळत आहे. युट्युब वरूनच अनेकांना रोजगाराच्या संधी मिळत आहेत. 'सिक्रेट सुपरस्टार' या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या चित्रपटात झायरा वसीम ही चित्रपटाची अभिनेत्री आहे. तिच्यामध्ये

असलेल्या गाण्याच्या कौशल्याला ती समाजापर्यंत पोहचवू शकत नाही. परंतु युट्युब सारख्या माध्यमांतून ती आपल्या परिस्थितीवर मात करून आपले गुण कौशल्य समाजापर्यंत पोहोचवते.




दुसरे उदाहरण म्हणजे निलीमा ठाकरे ज्या गोधडया तयार करून त्यांच्या गावात विकायच्या. पण फेसबुकवर त्यांनी पेज बनवून त्यांच्या व्यवसायाची जाहिरात केली व त्याला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. अशाप्रकारे अनेक घरगुती, लघु उदयोगांना या माध्यमांचा लाभ होतो. आदिवासी लोकांच्या दुर्मिळ प्रदेशात असलेल्या विदया-र्थ्यांची आता प्रगती होत आहे. ते विदयार्थी आपल्या अडचणी, मुद्दे चॅटरूम्स्, ब्लॉगस्, व्हिडियो कॉन्फरन्सींगच्या मदतीने सोडवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे लोकांचा कलही या दुर्मिळ प्रदेशाकडे वाढत आहे.

अशाप्रकारे समाजमाध्यमे व्यावसायिक, राजकीय व सामाजिक दृष्ट्या उपयुक्त ठरतात. फक्त त्याच्या तारतम्याने उपयोग करणे


महत्वाचे आहे. खरंतर समाजात माध्यमांचा उपयोग मोठ्या प्रमाणात होतोच, पण अशा वेगळ्या दृष्टिकोनातून केला तर त्याची उपयुक्तता अधिक वाढेल.


– वैष्णवी सुरडकर.
वर्ग ९ वा

मैत्री विज्ञानाशी

# आकृती कशी काढावी?


* प्रत्येक आकृतीसाठी पेपराचे अर्धे पान वापरावे.
* शक्यतो उत्तरपत्रिकेच्या मध्यभागी १२ सें.मी. याची चौकट करून त्यात आकृती काढावी.
* आकृती सुबक, प्रमाणबद्ध आणि योग्य नावे दिलेली असावी.
* चुकीची आकृती दुरूस्त करताना योग्य ती काळजी घ्यायला हवी.
* आकृती खोडण्याची गरज पडल्यास, खोडरबरने ती काळी होणार नाही, याची दक्षता घ्यावी.
* चांगले खोडरबर वापरावे.
* आकृतीला नाव सर्वात वर द्यायचे आणि बाण आकृतीतील घटकाकडे निर्देशित असावा.





# उलट्या चष्म्यातून....


दूरचित्रवाणीवरील मालिका घराघरांमध्ये प्रसिद्ध
असतात. त्यातील काही अविस्मरणीय मालिका
वर्षानुवर्षे प्रेक्षकांचे मनोरंजन करतात. अशाच
मालिकांपैकी एक म्हणजे 'तारक मेहता का उल्टा चष्मा'
तारक मेहता का उल्टा चष्मा ही एक हिंदी
दूरचित्रवाणी मालिका आहे. ती
२८ जुलै २००८ मालिका या समाजावर रोजी सब टी.व्ही
प्रभाव टाकणाऱ्या असतात. दूरचित्रवाणीवर
सुरू झाली म्हणूनच या मालिकेत अनेक जेठालाल
नामक सामाजिक मुद्दे हसतखेळत गुजराती
व्यापारी हाताळले जातात. कुठलीही व्यक्ती आपल्या
दैनंदिन संकटात असेल तर सगळे एकत्र आयुष्यातल्या
अडीअ- येतात. सर्व जाती धर्मांचे लोक ड्चणींना
कसा सामोरे एकत्र राहतात, सगळ्यांचे सण जातो आणि
त्याचा साजरे करतात. यातून परममित्र तारक
मेहता त्याला संस्कृतीचे जतन होते. कसा बाहेर काढतो
या मुख्य कथेवर या मालिकेचे भाग आहेत.
गोकुलधाम सोसायटीमधील दररोज घडणाऱ्या घटना
सुद्धा यात दाखविल्या जातात. त्या घटनांमधून
नेहमीच चांगला संदेश देण्याचा प्रयत्न केलेला असतो.
ही मालिका 'दुनिया ने उंधा चष्मा' या कॉलम
वरून साकार झाली. हा कॉलम तारक मेहता गुजराती




साप्ताहिक 'चित्रलेखा' साठी लिहित असत. त्याचेच हे मालिकेतले थोडे वेगळे रूप आहे. तारक मेहता का उल्टा चश्मा या शीर्षकातून एक अनोखा अर्थ प्रेक्षकांपर्यंत पोहोचतो. उलट्या चश्म्यातून म्हणजेच चांगल्या दृष्टिकोनातून सगळीकडे पाहिले तर जग खूप सुंदर आहे असे वाटेल. अगदी शीर्षक गीत सुद्धा हेच सांगते की अडचणी सगळ्यांनाच असतात फक्त दृष्टिकोन महत्त्वाचा.



मालिका या समाजावर प्रभाव टाकणाऱ्या असतात. म्हणूनच या मालिकेत अनेक सामाजिक मुद्दे हसतखेळत हाताळले जातात. कुठलीही व्यक्ती संकटात असेल तर सगळे एकत्र येतात. सर्व जाती धर्मांचे लोक एकत्र राहतात, सगळ्यांचे सण साजरे करतात. यातून संस्कृतीचे जतन होते. एकात्मता आणि धर्मनिरपेक्षता हे संदेश यातून समाजात पसरतात.







स्वच्छतेवर आधारित त्यांचे अनेक उपक्रम सुरू असतात. स्वच्छता सेनानी नावाचा पुरस्कारही ही मालिका देते. श्री नरेंद्र मोदी यांनी याचे कौतुक केले आहे. नुकतेच या टीमच्या वतीने सैनिकांसाठी ५ लाखांची मदत करण्यात आली. या सर्वच बाबी अभिमानास्पद आहेत.





या मालिकेने आता दहाव्या वर्षात पदार्पण केले आहे. यातील प्रत्येक पात्र अनोखे व नाविन्य-पूर्ण आहे. 'व्यक्तीतितक्या प्रकृती' या उक्तीप्रमाणे वेगवेगळे स्वभाव या मालिकेतून दिसतात. पोपटलाल सारखा नकारात्मक तर तारक मेहतासारखा

सकारात्मक अशा व्यक्तींची यात सांगड घातली आहे. अगदी आपलीशी आलेली ही पात्रें आपल्याला दररोज गुंतवून ठेवतात आणि आपल्या चेहऱ्यावर हास्य फुलवतात.

टप्पु सेना लहान मुलांना आकर्षित करते. ती मस्तीखोर असली तरी नेहमीच मोठ्यांचा आदर करते. या मालिकेत अनेक ठिकाणं दाखवली जातात. जसे हॉंगकॉंग, गोवाची ट्रीप. कधी कच्छच्या रणातली सफर. अशा ठिकाणांमुळे मालिकेत वेगळेपण आणि नाविन्यता येते. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ही मालिका सगळ्यांना हसवण्याचे मोठे काम करते. भारताची छोटीशी प्रतिकृती या सोसायटीतून दिसते.


मालिका या आपल्या मनोरंजनासाठी असतात. पण आजकालच्या मालिकांनी वेगळेच वळण घेतले आहे. मात्र तारक मेहता यांची ही मालिका सगळ्यांना हसवते, चांगले संदेशही पोहोचवते. आज सर्वाधिक बघितल्या जाणाऱ्या आणि आवडत्या मालिकेमध्ये याचा समावेश होतो. लोकांचे जीवन हास्याने फुलवणारी ही मालिका आज यशस्वी पथावर आहे. आणि लोकांना हसवण्याचे काम अविरत चालूच आहे.

— वैष्णवी अनिल सुरडकर



१ मार्च २०१७ रोजी दिवंगत झालेले कै. तारक मेहता यांना आमची ही भावपूर्ण श्रद्धांजली.

# देवदूताचे मंत्र



एकदा माझ्या स्वप्नात आला देवदूत,
निरोगी राहण्यासाठी मंत्र दिले खूप.

पहिला मंत्र दिला की ध्यानी तुम्ही वसा,
फास्ट फूड खाणार नाही निश्चय करा असा.

दुसऱ्या मंत्राला आता आपण मनी धरू,
घराच्या सकस अन्नाशी मैत्री पक्की करू.

तिसरा मंत्र तर तुम्ही अवश्य पाळा,
मोबाईल, टी.व्ही., कॉम्प्युटरचा अतिरेक टाळा.

चौथ्या मंत्राचा तर तुम्ही नित्य जप करा,
खेळ आणि व्यायामाची कास आता धरा

भरपूर पाणी पिण्याचा मंत्र दिला पाचवा,
सोबतच स्वच्छतेचे धडे तुम्ही गिरवा.

देवदूतालाही मग मी स्वप्नातच दिले वचन,
तुम्ही दिलेल्या मंत्रांचे करेन मी जतन.

- अनिकेत पाटखेडकर.



# साहित्यमय सफर

अगदी लहानपणापासूनच शाळेत छात्र प्रबोधिनीचे जुने-नवे सर्वच अंक आम्ही सर्वांनी पुन्हा-पुन्हा वाचले असल्याने त्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित राज्यस्तरीय भव्य कुमार साहित्यसंमेलनात जाण्यासाठी आम्ही फार उत्सुक होतो. ७ व ८ जानेवारी २०१६ रोजी आयोजित या संमेलनाला जाण्यासाठी आम्हा विद्यार्थ्यांचा चमू दोन शिक्षिकांसह अकोल्यावरून पुण्याकडे रवाना झाला. जाताना, दोन दिवसांची धमाल, मजा करण्याची ही सहल असा आमचा विचार. पण हा प्रवास केवळ मौजेपुरताच मर्यादित न राहता कित्येक नवीन ज्ञान, गोष्टी, साहित्याच्या सोबतीने एक अविस्मरणीय असा अनुभव ठरला.

निश्चित स्थानी म्हणजेच ज्ञानप्रबोधिनीची मुख्य इमारत असलेल्या ठिकाणी पोहचल्यावर नावनोंदणी केल्यानंतर थोड्याच वेळात पहिल्या सत्रातल्या उद्घाटन सोहळ्यासाठी आम्ही उपस्थित राहिलो. ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर, ज्येष्ठ संपादक मल्हार अरणकल्ले छात्र प्रबोधिनीचे संचालक गिरीश बापट या मान्यवरांनी उद्घाटन सोहळ्यात मार्गदर्शन केले. 'विज्ञान व साहित्याची सांगड घालून उद्याच्या भविष्याची सोनेरी वाट घडवा', असा महत्वाचा संदेश त्यांनी दिला. आणि येथूनच आमच्या साहित्यनगरीतील प्रवासाला खऱ्या

अर्थाने सुरुवात झाली.

दोन दिवसांच्या भरगच्च कार्यक्रमात अगदी मनापासून, कोणत्याही ताणतणावाशिवाय व खुलेपणाने उपस्थित सर्वांनी सहभाग नोंदविला. मुलं व मुलींचे प्रत्येकी २५; अशा एकूण ५० गटांत सर्वांची विभागणी झाली. आपआपल्या गटप्रमुखांसोबत व इतर गटातील सदस्यांशी ओळख, स्वतःचा परिचय असा नंतरचा कार्यक्रम झाला. पुढे हसत-खेळत भोजनाचा आस्वाद घेतल्यानंतर आम्ही कार्यशाळांमध्ये सहभाग घेतला. विज्ञान कथालेखन; ललितलेखन; प्रवासवर्णन; काव्य, Film Appreciation Writing अशा विविध २५ विषयांवर कार्यशाळा वेगवेगळ्या दालनांमधून घेण्यात आल्या. साहित्याचे विविध प्रकार वाचले असले तरीही ते लिहिताना घ्यायची काळजी, त्यातील बारकावे; लेखनाचा आनंद प्रथमच एवढ्या जवळून अनुभवला.

त्यानंतरच्या सत्रात विविध साहित्यिकांशी गप्पा असा गटानुसार कार्यक्रम होता. आम्ही तर चक्क छात्र प्रबोधनचे संपादक महेन्द्र सेठिया यांची मुलाखत घेतली. पुस्तकांच्या स्टॉल्सवर खरेदीही केली. नव्या मित्रमैत्रिणी सोबत फिरताना; पहिला दिवस कधी संपला ते कळलेही नाही. राहण्याची व्यवस्था छात्र प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांच्या घरांत होती. रात्री त्यांच्याबरोबर राहताना; पालकांशी बोलताना, नव्या वातावरणाशी किती चटकन जुळवून घेता येतो, याचा प्रत्यय आला. दुसऱ्या दिवशी ८ जानेवारी रोजी कार्यक्रमाची सुरुवातच श्री आप्पा पेंडसे लिखित 'विकसता विकसता विकसावे' या सुंदर गीताच्या सोबतीने उपासना करत झाली. त्यानंतर अभिवाचनाच्या कार्यक्रमात

सहभाग व मान्यवरांची मुलाखत असा बेत होता. विविध क्षेत्रांत उत्तुंग यश मिळविलेल्या व्यक्तिमत्वांशी गप्पा मारत, आम्हा सर्वांनाच एक नवी प्रेरणा मिळाली. त्यानंतर अनेक कल्पक स्पर्धांत सहभागी होत, आनंद लुटत, सुंदरशी पुस्तके आम्ही 'बक्षीस' म्हणून मिळविली. शेवटी इंद्रजित भालेराव, लीना मेहंदळे या प्रमुख पाहुण्यांच्या मार्गदर्शनाने संमेलनाचा समारोप झाला. केवळ पुस्तकी शिक्षणांत न गुंतता कलागुणांना वाव देत अनुभवातून जीवनशिक्षण घ्या असा मोलाचा विचार आम्ही या कार्यक्रमातून घेतला. तेथे उपस्थित ज्ञानप्रबोधिनीच्या सर्वच सदस्यांनी केलेले आदरातिथ्य मनाला भावले. पालकांनीदेखील त्यांच्या प्रेमळ वागणुकीतून क्षणभरही आम्ही घरापासून दूर आहोत अशी जाणीव होऊ दिली नाही. दोनच दिवसांत आम्ही त्या वातावरणाशी इतके जुळून गेलो की परतत असताना या ज्ञानप्रबोधिनीच्या कुटुंबाचा आपणही एक भाग आहोत अशी सर्वांची भावना होती. या संमेलनाच्या निमित्ताने स्वतःतील साहित्यिकाला वाव देण्याची संधी आम्हाला मिळाली. संमेलन संपले तरीही त्याच्या आठवणी मात्र मनात रेंगाळत राहतील त्या कायमच्याच.

हा केवळ आमचा अकोला-ते-पुणे एवढा प्रवास नव्हता, तर साहित्यनगरीत जाऊन साहित्यमग्न होण्याचा अनुभव होता.

मानसी राऊत
वर्ग ९ वा

# जागवा वाचनसंस्कृतीला

वाचनसंस्कृती जोपासण्याकडे लक्ष वेधण्याची आज आपल्याला गरज का भासते आहे? असा गंभीर प्रश्न प्रथम आपल्यासमोर डोके वटारून उभा आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे बदललेली शिक्षण प्रणाली आणि मातृभाषा सोडून दुसऱ्या म्हणजेच इंग्रजी भाषा हे शिक्षणाचे माध्यम आहे, असे दिसून येते.

> बाबासाहेब आंबेडकर म्हणून गेले की, 'वाचाल तर वाचाल.' मात्र, आजच्या पिढीने या वाक्याची रचनाच आधुनिकरित्या बदलवली ती अशी की, 'इंटरनेटवर राहाल तरच टिकाल.'

आजच्या या गतीने बदलणाऱ्या युगात प्रत्येक पालकांचा आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकवण्याचा आणि सी. बी. एस. सी पॅटर्नचा अभ्यासक्रम देण्याचा आग्रह असतो. ही प्रणाली खरं पाहता इंग्रजी भाषेला पुरस्कृत करणारी आहे. प्राथमिक शिक्षणासह उच्च शिक्षणासाठी देखील याच भाषेची गरज भासते. मात्र, त्यामुळे आपल्या मायबोली, मराठी भाषेकडे फार दुर्लक्ष होत असल्याचे प्रकर्षाने जाणवू लागले आहे.

तंत्रज्ञान आणि आजच्या आंतरजालाच्या ई-युगात पुस्तकांपेक्षा नवीन पिढी इंटरनेटला जास्त महत्त्व देऊ लागली आहे. नवीन पिढीने आजचे ई-युग एवढे जवळ केले आहे, की पूर्वीसारखी मानवी मूल्ये आज जोपासण्यात मुले खूपच मागे राहतात.

प्राचीन काळापासून ग्रंथांनी आपल्याला ज्ञान तर दिलेच मात्र त्याचबरोबर माणुसकी, प्रामाणिकपणा इत्यादी मूल्यांची रुजवणूकही केली. तसेच आजची मानवाची ही प्रगती या ग्रंथामुळेच साधली गेली आहे. मात्र, आजची आधुनिक पिढी हे समजून घेत नाही. आजकाल ई-पुस्तकांच्या मागे लागल्यामुळे आपली वाचन संस्कृती जोपासणे फारच कठीण झाले आहे.

आजकालचे युग स्पर्धात्मक होऊ लागले आहे, त्यामुळे आज जगात प्रत्येक गोष्ट स्पर्धेसाठी होते व अशामध्ये नक्कीच इंटरनेटच आघाडीचा ठरेल. वाचनसंस्कृतीला आजकाल महत्त्व कमी झाले असून त्यांची जागा ई-पुस्तक संस्कृतीने घेतली आहे असेच म्हणावे लागेल.

ई-पुस्तकांचा अतिवापर केल्याने त्याचा दुष्परिणाम नक्कीच घातक ठरत आहे. ई-पुस्तकांच्या मागे लागून सतत मोबाईलचा खेळ सुरू असल्याचे आपणाला दिसते. या काळातील ही आधुनिक प्रथा 'हातचे सोडून

पळत्याच्या मागे मुलांनी लागणे' असाच हा
प्रकार आहे. प्रथम प्राचीन त्यामुळे विदया-
र्थ्यांचा पुस्तके वाचावीत तसेच एकंदर मानवाचा
बुध्दीचातुर्याला आव्हान देऊन मानसिक
स्वत:च नवीन, अद्ययावत पुस्तकांची आणि
निर्मिती करावी. इंटरनेटचा शारिरीक
वापर मदत म्हणून विकास खुंटत
करण्यात हरकत चालला आहे. तसेच
नाही. ई-पुस्तकांचा अतिवापर
डोळ्यांचे आजार तसेच नैराश्य-
सारख्या आजारांना निमंत्रण देत आहे.
त्याचप्रमाणे विदयार्थ्यांमधील कलात्मकता
आणि नाविन्यता या गोष्टी हरवत चालल्या
आहेत. खरं पाहता मानवाची अधोगती होत
आहे. मात्र, या गोष्टीपासून तो जणू
वंचितच आहे.

आजकालची पिढी तशी हुशार आणि
चाणक्यच ! मात्र, या ई-साधनांमुळे आज
ती हुशारी आणि चातुर्थ लोप पावतांना
दिसते. त्यासाठी आपल्या प्राचीन संस्कृतीचा
वारसा जपणेच योग्य राहील. वाचन संस्कृती
मुलांमध्ये एक नवा सकारात्मक दृष्टिकोन
रुजवेल तसेच भावी नागरिक होण्याकरिता
योग्य मुल्यांची जपवणूक मुलांमध्ये होईल.
तसेच आपल्या आजच्या या नवीन अभ्यास-
क्रमासाठी ग्रंथालयांचे आधुनिकीकरण करणे
गरजेचे आहे त्यासाठी मुलांनी प्रथम प्राचीन

पुस्तके वाचावीत तसेच बुध्दीचातुर्याला आव्हान देऊन स्वत:च नवीन, अद्ययावत पुस्तकांची निर्मिती करावी. इंटरनेटचा वापर मदत म्हणून करण्यातही काही हरकत नाही. मात्र, त्यावर सर्वस्वी अवलंबून न राहता आपल्याला नवीन निर्मिती करता आली पाहिजे. मानवाने विशेषत: विद्यार्थ्यांनी या गोष्टी शिकल्या की, वाचनसंस्कृतीची जोपासना आपोआपच होईल. त्यासाठी वेगळे काही करण्याची आवश्यकता नाही.

वाचन संस्कृती जोपासण्यात मानवाला यश आले, नवनिर्मिती करण्यात रस वाटला तसेच बुध्दी आवाक्याच्या मर्यादेपलीकडे जाऊन विचार करण्याची दृष्टी मानवामध्ये विकसित झाली तर त्याचा सर्वांगीण विकास होऊन जगाला मानवाचे नावीन्यपूर्ण रूप दिसेल.


- गौरी मिसुरकर.

# विचारमोती


* वाणी आणि पाणी जपून वापरा. वाणीमुळे तुमचा वर्तमानकाळ व पाण्यामुळे तुमचा भविष्यकाळ सुरक्षित राहणार आहे...
* ज्ञानसंग्रह करण्याचे प्रबळ साधन म्हणजे वाचन होय.

संकलक - कोमल दिपक पाटणकर [वर्ग-८]
जठारपेठ, अकोला.


# WhatsApp च्या युगात



खूपच Advance असे
आजच्या युगातील पिढी
मोबाईलच्या जगात गुंतून
स्वत:ला Smart म्हणते वेडी




Delete होत आहे जीवनातील
आनंद एका क्षणात,
मित्रांच्या Like वर आनंदी होणारे
नाते जपतील का पुढे मनात ?



फोटोंच्या माध्यमातून
Save होतात आठवणी
उद्या DP बदलावा लागेल
हा विचार मात्र सदैव मनी



एकविसाव्या शतकातील नवी पिढी
असे भलतीच cute
Contact list वाढवतांना
नाते होत आहेत Mute






आईचे प्रेम नको मला हवे
आहे Whatsapp
म्हणे तुला नाही कळणार
आहे फार मोठा Generation gap

एक दिवस असा येईल की
हरवेल आयुष्याची File
हसण्याचे चित्र पाठवतांना
विसरेल का मनुष्य आपली Smile?

– गौरी सुधीर मिसुरकर.

## चित्रकोडे





– राधिका गुणवंत महल्ले
वर्ग ८ वा
ज्योती नगर, जठारपेठ,
अकोला.


(उत्तरे इतरत्र)


# मूल्यशिक्षणाची गरज

शिक्षणाने माणूस सुसंस्कृत तसेच प्रगल्भ होतो असा सर्वसाधारण समज आहे; परंतु आज आपल्या असे लक्षात येते की, आमच्या सारख्या लहान मुलांपासून ते अगदी महाविद्यालयात शिकणाऱ्या मुलांच्या वागण्याकडे व बोलण्याकडे पाहिले असता त्यांच्यामध्ये नम्रता, सौजन्य, माणूसकी, प्रेम, दयाभाव, संयम व दुसऱ्यांप्रती आदर हे गुण आढळत नाही, त्यामुळे मला असे वाटते की, विद्यार्थीदशेत असणाऱ्या सर्वांना परंपरागत शिक्षणासोबतच नीतिमूल्यांवर आधारित शिक्षण देणेसुध्दा गरजेचे आहे. कारण, व्यक्ती जशी बुध्दीमान असणे आवश्यक आहे तशीच ती चांगला माणूस-देखील होणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

आपल्या देशात अनेक थोर शिक्षणतज्ज्ञ होऊन गेले त्या प्रत्येकाने शिक्षणात हुशार होण्यावर भर तर दिलाच परंतु त्याबरोबरच एक चांगला माणूस बनवण्यावरसुद्धा त्यांनी भर दिल्यासंबंधी आग्रह केला.

नैतिक शिक्षण म्हणजे काय ? तर जी

शिक्षणपद्धती आपल्याला चांगला माणूस बनवते कोणते वर्तन चुकीचे आहे व कोणते बरोबर आहे, हे शिकवते त्याला आपण ढोबळमानाने नैतिक शिक्षण म्हणू शकतो. प्रत्येकाप्रती चांगली, नम्रतापूर्वक आणि दुसऱ्यांना सन्मान देणारी वागणूक ही नैतिक शिक्षणाची सुरूवात आहे, असे मला वाटते व ही सुरूवात आपल्या घरापासून होते. आपण आपल्या घरात कसे वागतो ? कसे बोलतो ? यावरून आपले बाहेरचे वागणे ठरत असते जसे शाळेत आपल्याला गणित शिकवले जाते त्याप्रमाणे नैतिक शिक्षण शिकता येत नाही. नैतिक शिक्षण हे शिकता येत नाही. नैतिक शिक्षण हे उदाहरणांवरून, प्रत्यक्ष कृतीवरून, बोध-कथांवरून शिकवले जाणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने घरोघरी तसेच शैक्षणिक संस्थांमधून याकरिता प्रयत्न करणे गरजेचे आहे. माझ्यासारखा विद्यार्थी खूप हुशार असेल परंतु तो शाळेत शिक्षकांना उलट उत्तर देत असेल, हट्टीपणा करत असेल, आईवडिलांशी चांगला वागत नसेल, दुसऱ्यांना कमी लेखत असेल, गर्विष्ठपणा करत असेल तर त्या विदयार्थ्याच्या हुशारीला योग्य तो मान मिळणार नाही. कारण, हुशारीसोबतच नम्रता असणे आवश्यक आहे. ही नम्रता शिकणे म्हणजे नैतिक शिक्षण होय. आपल्या महान देशामध्ये जगाचे नेतृत्व करण्यासाठी अशी




नितांत नीतिमत्ता जपणारी पिढी निर्माण होणे ही काळाची गरज आहे म्हणून पारंपारिक शिक्षणाबरोबरच नीतिमूल्यांवर आधारित शिक्षणाचीसुध्दा आमच्यासारख्या विद्यार्थ्यांना अत्यंत आवश्यकता आहे, असे मला वाटते.

- अनिकेत अजित पाटखेडकर
वर्ग ७ वा
जवाहर नगर,
अकोला.

## कला स्वाद

# फुलदाणी

साहित्य : मक्याचे पीठ, बोरॅक्स पावडर, काचेचे पसरट भांडे.



कृती : फुले सुकवण्यासाठी सहा भाग मक्याच्या पिठात १ भाग बोरॅक्स पावडर मिसळा. एका काचेच्या पसरट भांड्यात हे मिश्रण भरा आणि उंच देठासकट उलटे फूल त्या मिश्रणात बुडवा. पूर्ण फुल आणि हवा तेवढा देठ मिश्रणात बुडला पाहिजे. दोन आठवड्यांनी सुकलेले पीठ दूर करा. मधे सुंदर सुकलेले फूल मिळेल.

चित्रकोड्याची उत्तरे :

① स्वातंत्र्य दिन ② बालिका दिन ③ विज्ञान दिन
④ युवक दिन ⑤ बालक दिन ⑥ शिक्षक दिन

# वेगळी वाट



दिनांक २६/१२/२०१८ रोजी शाळेतील वर्ग १०-च्या विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यास आलेल्या आदित्यच्या वेगळ्या वाटेविषयीची उत्सुकता होती. त्याबद्दल जाणून घेण्यासाठी या मुलाखतीचे प्रयोजन.

**ओजस्वी** – वेगळी वाट निवडण्याचा विचार केव्हा मनात आला? का?

इयत्ता नववीत असताना होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेसाठी डॉ. नितीन ओक व सुहास उदापूरकर सरांच्या मार्गदर्शनात 'गाजरगवताचे निर्मूलन मेक्सिकन बीटलसच्या सहाय्याने' या विषयावर प्रकल्प केला. पुढे संशोधनक्षेत्रात जाण्याचा विचार आईजवळ बोलून दाखवला. पालकांनी प्रोत्साहन दिले. RMO, INMO, IMOTC मुळे गणित संशोधकांशी संपर्क आला. इयत्ता ११वीतच गणितात करियर करायचे जवळपास निश्चित केले होते.

**वैष्णवी** – तुझ्या क्षेत्राविषयी माहिती देशील का?

मी सध्या चेन्नई येथे B.Sc. (Hons) पदवीचा अभ्यासक्रम निवडला आहे. प्रथमवर्षाला गणित, संगणक-विज्ञान, भौतिकशास्त्र इ. विषय होते. येथे सर्व शास्त्रज्ञ संशोधन करतानाच आम्हाला मार्गदर्शन करतात. स्वयंअभ्यासावर भर आहे. अनुप्रयोग आधारित अभ्यासक्रम आहे. दैनंदिन व्यवहारांपासून ते आंतरराष्ट्रीय उद्योगापर्यंत गणित संशोधन

क्षेत्राचे महत्त्व आहे. विविध आंतरराष्ट्रीय संस्थांशी हे क्षेत्र जुळलेले आहे.

वैष्णवी - या क्षेत्रातील विशेष आदर्श कोण ?

भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन माझे आदर्श.


ओजस्वी - तुझे ध्येय किंवा स्वप्न काय ?

आपण मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत व्हावा. शालेय विद्यार्थ्यांसाठी गणितं डिझाइन करून मी JOMO वर टाकत असतो. नवं तंत्रज्ञान शेवटच्या घटकापर्यंत पोहचवले पाहिजे.

वैष्णवी - विदेशातील अनुभव ऐकायला आम्हाला आवडेल.

ASC 2017 (Asian Science Camp) साठी ऑगस्ट मध्ये मलेशियाला गेलो होतो. वर्षभराच्या प्रगतीवरून त्याकरिता निवड झाली. Pure Science विषयातील २० विद्यार्थी मलेशियाला भारताचे प्रतिनिधित्व करण्या साठी पाठविण्यात आले. ही उत्तम संधी ठरली. त्याचा हेतू मुळात आंतरराष्ट्रीय स्तरावर संबंध निर्माण करणे हा असतो. त्यामुळे खूप मित्र मिळाले. देशविदेशातील गणितज्ञ व वैज्ञानिकांशी चर्चा करता आली. इंटरनेटमुळे सगळे जुळलेले असलो तरी प्रत्यक्षात अनुभवलेलं शिबीर खूप आनंद देऊन गेलं. त्यात विविध स्पर्धा होत्या. दुसऱ्या देशातील मुलांसोबत गट पाडण्यात आले. आपल्या भारतीय संस्कृतीला सर्वधर्मसमभाव व विश्वबंधुत्व या कल्पनेची जोड असल्याने जगात अनन्यसाधारण महत्त्व आहे व भारतीयांकडे पाहण्याचा जगाचा दृष्टिकोन किती आदराचा आहे

ही जाणीव झाली. मी शाकाहारी असल्याने तिथल्या जेवणाचा अनुभवही खूप वेगळा होता. मलेशियाने ज्या विद्यापीठामध्ये हा कॅम्प आयोजित केला होता, तो Uttar Camp परिसर अत्यंत नयनरम्य होता. तिथल्या प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या व खूप चांगल्या आठवणींसह भारतात परतलो. भारतातून पाठविलेल्या इतर २० विद्यार्थ्यांशी चांगली ओळख झाली. तसेच जपान, भूतान, उझ्बेकिस्तान, इतर देशांतील अनेक नवे मित्रमैत्रिणी मिळाले. इंटरनेटवर खूप वैज्ञानिकांशी ओळख झाली. IISC Banglore, IISER Calcutta यांच्या संपर्कात आलो, त्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभते. यावर्षी आता Apprenticeship करिता विदेशात जाऊ इच्छितो.



वैष्णवी - तुझे जे सत्कार किंवा कौतुक झालेत त्याविषयी जाणून घ्यावेसे वाटते.

सत्कार किंवा कौतुक हा प्रोत्साहनाचा भाग आहे असं मानतो. सर्व शिक्षकांकडून मिळालेली कौतुकाची थाप, प्राथमिक शिक्षणात संगवई टिचरांचे मार्गदर्शन; वडिलधाऱ्यांचे मार्गदर्शन, शुभचिंतन व प्रेमाचा वर्षाव झाला. आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली हाच खरा सत्कार!

ओजस्वी - तुझी आवड काय? छंद काय?

मला लहानपणापासून पक्षीनिरीक्षणाची आवड आहे. छायाचित्रण आवडते. आता सी.एम.आय मध्ये 'Iasellite' उपक्रमाचे आयोजन आम्ही करतोय. डिबेट (वादविवाद) व प्रश्नमंजुषा यात विशेष रूची आहे. मी फुटबॉल खेळतो, मित्र जमविण्याची देखील मला आवड आहे. वाचनाचा छंद आहे. निवडक चित्रपट पाहतो. संगीतही आवडतं.

वैष्णवी - तुझ्या स्वतःकडून काही अपेक्षा?

मी IPMO पास झाल्यावर भारताला सिल्वर मेडल मिळाले. तेव्हा मी ठरविले की मला माझ्या क्षेत्रात काहीतरी भरीव कार्य करायचे आहे. प्रत्येकच क्षेत्र चांगलं असतं समाजोपयोगी व सर्वांना अभिमान वाटावा असं काही करायचं आहे. समाजाच्या उन्नतीसाठी झटणारे नागरिक निर्माण करण्याच्या उदात्त हेतूत सहभागी होत आहे याचा मला आनंद आहे.

ओजस्वी - तरुण पिढीला काय संदेश देशील ? आमच्याकडून अपेक्षा काय ?

प्रामाणिक प्रयत्न व मेहनतीला दुसरा कोणताही पर्याय नाही. मोठी स्वप्ने पहा.

अपेक्षा :- भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या व तुटपुंज्या साधनांच्या भरवशावर व सुविधांचा अभाव असतानादेखील आहे त्या परिस्थित मार्ग काढायला हवा. विविध क्षेत्रांत विशेषत: मूलभूत विज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक फंडस्, शिष्यवृत्ती उपलब्ध करुन दिल्या जातात. त्या सर्व शिष्यवृत्तींचा फायदा घेऊन, ज्ञान मिळवून देणाऱ्या विकासास हातभार लावता येईल. स्वतःच्या आवाक्यात असलेल्या गोष्टी इतरांसाठी देखील करता येतील. पुढे अधिक विद्यार्थी संशोधनात रस घेतील अशी अपेक्षा आहे.

तुमच्या आवडीच्या क्षेत्रात करियर करायचे ठरविले तर आपल्या कामाचा कधीही कंटाळा येणार नाही. आनंदाने छंद जोपासल्यासारखे काम करताना वाटेल.

आदित्य अरुण राऊत
CMI (चेन्नई मॅथेमॅटिकल इन्सटिट्यूट)
B.Sc. II yr, SIPCOT आय.टी. पार्क
सिरुसेरी, केलमबक्कम., चेन्नई.

मुलाखतकार :-
ओजस्वी बोर्डे
वैष्णवी अ. सुरडकर


भावपूर्ण
श्रद्धांजली

